# प्रेसनोट

दिनांक 04.09.2020

| | |
|---|---|
| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी खाजगी इसम नांव व कार्यालय | 1) श्री. डॉ. रामदास शामराव शिंदे वय 61 वर्षे, धंदा डॉक्टर रा. देऊळगावराजा ता. देऊळगावराजा जि.बुलडाणा (नगराध्यक्ष पती)<br>2) श्री. प्रविण भगीरथ बन्सीले वय 49 वर्षे रा. दुर्गाचौक, देऊळगावराजा ताञ देऊळगावराजा जि.बुलडाणा (पर्सनल असीस्टंट) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | 80,000/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | 80,000/- रुपये |
| घटनास्थळ | देऊळगावराजा ते जालना रोड वरील खाजगी इसम यांचे शिंदे हॉस्पीटल व राहते घर |
| घटना तारीख | दिनांक 04.09.2020 |

**थोडक्यात हकीकत-**

यातील तक्रारदार यांची आई नगर परीषद मधुन सफाई कामगार म्हणुन सेवानिवृत्त झालेल्या असुन त्यांचे जागी तक्रारदार यांचे पत्नीस वारसा हक्काने सफाई कामगार म्हणुन नोकरीस लावण्याकरीता नगर परीषद देऊळगावराजा येथे नगराध्यक्ष असलेल्या आरोपी क्र.1 यांचे पत्नीस सांगुन नगर परीषदचे विषय सुचीमध्ये ठराव घेवुन ठरावात नाव टाकण्याकरीता 80,000/- रुपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा घटकाकडे नोंदविली होती.

सदर तक्रारीवरुन दिनांक 28.08.2020 रोजी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता आरोपी क्र.1 श्री. डॉ. रामदास शामराव शिंदे रा. देऊळगावराजा जि.बुलडाणा यांनी तक्रारदार यास त्यांचे पत्नीस वारसा हक्काने सफाई कामगार म्हणुन नोकरीस लावण्याकरीता नगर परीषद देऊळगावराजा येथे नगराध्यक्ष असलेल्या पत्नीस सांगुन तक्रारदार यांचे पत्नीचा नावे ठराव घेवुन ठरावात नाव टाकण्याकरीता पंच क्र.1 यांचे समक्ष 80,000/- रुपये ची लाचेची मागणी केली व लाच स्किारण्याची तयारी दर्शविल्याने आज दिनांक 04.09.2020 रितसर सापळा कार्यवाही आयोजीत केली असता आरोपी क्र.1 श्री. डॉ. रामदास शामराव शिंदे रा. देऊळगावराजा यांनी पंच क्र.1 यांचे समक्ष लाचेची रक्कम 80,000/- रुपये डाव्या हाताने स्विकारुन ती आरोपी क्र.2 श्री. प्रविण भगीरथ बन्सीले रा. देऊळगावराजा (पर्सनल असीस्टंट) यांचेकडे दिले. आरोपी क्र.1 श्री. डॉ. रामदास शामराव शिंदे यांनी आपले नगराध्यक्ष असलेल्या पत्नीच्या पदाचा गैरवापर करुन स्वत:साठी पैशाचे स्वरुपातील आर्थीक लाभ मिळविण्यासाठी न शोभणारे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द कलम 7 (अ) लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम 1988 संशोधन 2018 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही, 1) मा.श्री.श्रीकांत धिवरे-पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती
2) मा.श्री.पंजाबराव डोंगरदिवे- अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. आर. एन. मळघणे, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा व सापळा पथकातील स्टॉफ- पोना.विलास साखरे, सुनिल राऊत, रविंद्र दळवी, पोकॉ विजय मेहेत्रे, विनोद लोखंडे, महीला पोकॉ स्वाती वाणी चालक पोकॉ मधुकर रगड, शेख अरशद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा कार्यालय दुरध्वनी क्रमांक 07262-242548 तसेच टोल फ्रि क्र.1064 यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी केले आहे.

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

**(आर. एन. मळघणे )**
**पोलीस उपअधिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा**

Scanned with CamScanner